

# यावर्षी भारतामधून 'MEXT' शिष्यवृत्तीसाठी सगळे विद्यार्थी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे

**पुणे**: पुण्यातील नामांकित टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील (टिमवि) जपानी भाषा विभागाच्या ६ विद्यार्थ्यांची जपान सरकारच्या अत्यंत प्रतिष्ठित अशा 'मेक्स्ट' (MEXT - Ministry of Education, Culture, Sports, Science and Technology) या शिष्यवृत्तीसाठी संपूर्ण भारतातून निवड झाली आहे. उच्च शिक्षणासाठी व जपानी भाषेच्या सखोल अभ्यासासाठी हे विद्यार्थी एक वर्षासाठी जपानला रवाना होणार आहेत.

जपान सरकारतर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या या उच्चस्तरीय शिष्यवृत्तीसाठी देशभरातून कठीण निवड प्रक्रिया पार पडते. यावर्षी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर यात बाजी मारली आहे. ही शिष्यवृत्ती मिळवलेले विद्यार्थी जपानमधील नामांकित विद्यापीठांमध्ये पुढील १ वर्षासाठी जपानी भाषा, संस्कृती आणि साहित्याचा सखोल अभ्यास (Japanese Studies) करणार आहेत. या कालावधीतील विद्यार्थ्यांचा सर्व शैक्षणिक खर्च, राहणे आणि प्रवास खर्च जपान सरकारतर्फे केला जाणार आहे.

**निवड झालेले विद्यार्थी आणि त्यांना मिळालेली जपानी विद्यापीठे**:

- **श्रीजा कोलते - शिनशु विद्यापीठ**
- **दीपाश्री हिवरे - मिए विद्यापीठ**
- ज्यूंतोसंग आएर - साईतामा विद्यापीठ
- **मयूरेश पायगुडे - तोयामा विद्यापीठ**
- **अभिन्या दांडेकर - नागोया विद्यापीठ**
- **दीपश्री देशमुख - हीरोसाकी विद्यापीठ**

या विद्यार्थ्यांना उमा गोखले, बकुल वैद्य, वृषाली पुंडे व मदुरा मांडके या प्राध्यापकांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बोलताना विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, "टिमविचा जपानी भाषा विभाग हा गेल्या अनेक वर्षांपासून दर्जेदार शिक्षणासाठी ओळखला जातो. **यशाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवत** टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या जपानी भाषा विभागातून गेल्या वर्षी विद्यापीठाच्या ८ **विद्यार्थ्यांची**, तर त्याआधी **६ विद्यार्थ्यांची** या प्रतिष्ठित MEXT शिष्यवृत्तीसाठी निवड झाली होती. यंदाही ६ विद्यार्थ्यांची निवड झाल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे आणि हा विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे."

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गीताली टिळक, कुलसचिव डॉ. सुवर्णा साठे, विभाग प्रमुख डॉ. मंजिरी भालेराव तसेच जपानी भाषा विभागातील समन्वयक व प्राध्यापकांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस व जपान दौऱ्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.